महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग
## Government Medical College, Sindhudurg

Website –www.gmcsindhudurg.com Phone no - 02362/ 228355 Email - deangmcsindhudurg@gmail.com
Add – A/P Oros Sindhudurg Nagari, Tal – Kudal, Dist – Sindhudurg, Pin Code - 416812

जा.क्र.शावैमसिं/ स्कॉलरशिप / 1254-57 /

दिनांक 04/ ०३ /२०२६

# नोटीस

विषय: २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये mahadbt portal वर ऑनलाईन शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेबाबत...

उपरोक्त विषयांनुसार, या महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, mahadbt portal ( https://mahadbtmahait.gov.in) च्या माध्यमातुन स्कॉलरशिपसंदर्भात अर्ज भण्याची प्रक्रिया चालु झाली असून पात्र विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर अर्ज भरावेत.

mahadbt portal वर विविध प्रकारच्या शासकीय योजनांची (स्किमची) तसेच ऑनलाईन अर्ज भरण्याबाबतची संपूर्ण माहिती दिलेली आहे. सदरच्या माहितीच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्ज भरावेत.

त्याअनुषंगाने शासन निर्णय क्रमांक :मकृप-१०२४/अनौ.१२/प्र..क्र.११८/७-अे, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२४ महिलासाठी mahadbt portal **राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत मुलींसाठी शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्काची परतफेड (१००%शिक्षण शुल्क +परीक्षा शुल्क)**. ही स्किम राबवीण्यात आलेली आहे. वार्षिक कौटुंबिक उत्पन्न रक्कम रुपये ८,०००००/- लाखापेक्षा कमी असलेल्या (EWS, EBC SEBC OPEN) पात्र महिला विद्यार्थ्यांनी या योजने अंतर्गत अर्ज करण्यात यावा. (According to DMER)

राज्यातील शासकीय, अशासकीय अनुदानित व शासन मान्याता प्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने आणि शासकयि विद्यापीठात विनाअनुदानित तत्वावार सुरु असलेल्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील (OBC,VJNT, SBC) विद्यार्थ्यांसाठी असलेली शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क प्रतिपुर्ती योजनाकरिता उत्पन्नाची अट रद्द करण्यात येत असून त्याऐवजी **नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र** सादर करणे शासन निर्णय क्र. शिवृत्ती -२०२३/प्र.क्र.१३५/शिक्षण -१ दिनांक २० सप्टेंबर २०२४ या निर्णया अन्वये बंधनकारक करण्यास शासनाची मान्यता देलेली आहे. त्यामुळे mahadbt portal वर ऑनलाईन अर्ज करते वेळी नॉन - क्रिमीलेयर प्रमाणपत्र जोडणे आवशयक आहे.

भारत सरकार पोस्ट-मॅट्रीक शिष्यवृत्ती (एस.सी स्कॉलरशिप ) योजने अंतर्गत अर्ज करणाऱ्या नवबौध्द/अनुसुचित जातीतील पात्र विदयार्थ्याना सुचित करण्यात येते की सदर योजनेतंर्गत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दिनांक १७ मार्च, २०२२ व ०७ जुलै, २०२३ या शासनिर्णयात नमुद केलयानुसार अनुसुचित जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांना केंद्र शासनाची ६०% हिस्याची रक्कम महाडीबीटी प्रणालीद्वारे विद्यार्थ्यांच्या संलग्न बँकखात्यात जमा झाल्यानुसार विद्यार्थ्यांनी निर्वाह भत्ताची रक्कम वजा करुन उर्वरित शुल्काची रक्कम संबधित महाविदयालयास ०७ दिवसांच्या आत जमा करण्याचे निर्देश दिले आहे.

तसेच, संबंधीतांनी शेवटच्या तारखेची वाट बघत थांबू नये, ३१ मार्च २०२६ तारखेपुर्वी अर्ज परिपूर्ण भरुन mahadbt portal वर ऑनलाईन अर्ज (Online Submit) पाठविण्यात यावेत.

04-03-2026

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,सिंधुदुर्ग

अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
सिंधुदुर्ग

प्रति,

उपरोक्त सर्व विद्यार्थी.

प्रत.

१) नोटीस बोर्ड,शासकीय वैदयकीय महाविद्यालय, सिंधुदुर्ग

२) नोटीस बोड,मुलांचे १/मुलिंचे १ वसतीगृह शासकीय वैदयकीय महाविद्याल, सिंधुदुर्ग

प्रति,

सदरची नोटीस दि ०४-०३-२०२६ रोजी महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर प्रदर्शीत करावी.